# <u>जाहिरनामा</u>

1 मा. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.)विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मातंसं-1716/प्र.क्र./517/39 दिनांक 19 जानेवारी, 2018 रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील सध्या कार्यरत असलेल्या एकात्मिक नागरी सुविधा केंद्र (सेतू), महा-ई सेवा केंद्र तसेच संग्राम केंद्रांना **"आपले सरकार सेवा"** केंद्राचा दर्जा देवून अधिसूचीत करण्यात आलेले असून सदरची यादी नांदेड जिल्हयाच्या https://nanded.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णयानूसार शहरी व ग्रामीण भागातील लोकसंखेच्या निकषानुसार रिक्त पदांची यादीसुध्दा जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

रिक्त असलेल्या जागी नवीन **<u>"आपले सरकार केंद्र"</u>** चालविणेसाठी इच्छुक असलेल्या अर्जदारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत. **"आपले सरकार सेवा"** केंद्रासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना नांदेड जिल्हयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यानुसार नांदेड जिल्हयातील C.S.C. (कॉमन सर्व्हीस सेंटर) धारकांना व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील त्या भौगोलीक क्षेत्रात राहणारा कोणताही व्यक्ती ज्यांचे केंद्र सुरु नसेल परंतू जो C.S.C. (कॉमन सर्व्हीस सेंटर) - S.P.V. (स्पेशल पर्पज व्हेईकल) चे केंद्र मिळण्यासाठीच्या विहित नमुन्याच्या अर्जातील शर्ती पूर्ण करीत असेल अशा व्यक्तींनी दिनांक 17.11.2018 रोजी पर्यंत लेखी अर्ज अचूक व परिपूर्ण भरुन कार्यालयीन वेळेत सेतू समिती (संगणक कक्ष) पहिला माळा, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे स्वतः येवून अर्ज सादर करावे व पोहच घेण्यात यावी. आपले सेवा केद्र चालविण्यासाठी प्राप्त अर्जाची छाननी, पात्र/अपात्र व अंतिम केंद्राची प्रसिध्दी नांदेड जिल्हयाच्या संकेतस्थळावर प्रसध्दि करण्यात येईल त्यामुळे अर्जदारांनी नांदेड जिल्हयाच्या उपरोक्त संकेतस्थळावर वेळोवेळी भेट देवून माहिती मिळवावी. सदर **"आपले सरकार केंद्र"** देण प्रक्रिये बाबतचे सर्व अधिकार/निर्णय जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष सेतू समितीचे राहतील. सदर जाहिरातीच्या अधिक माहितीसाठी नांदेड जिल्हयाच्या https://nanded.gov.in/ संकेस्थळावर भेट दयावी.

**अध्यक्ष,**
**जिल्हा सेतू समिती,**
**(जिल्हा ई-गर्व्हनन्स सोसायटी),**
**तथा जिल्हाधिकारी, नांदेड.**

जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड
क्रमांक सेतू/कावि/403/2018
दिनांक :-

**<u>"आपले सरकार सेवा केंद्र" मिळणेकामीच्या अटी व शर्ती :-</u>**

1. महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मातंसं-1716/प्र.क्र.517/39 दिनांक 19 जानेवारी,2018 मधील निकष, कार्यपध्दती, सुविधा, जबाबदा-या, कारवाईची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेस अधीन राहून केंद्राची नियुक्ती करुन केंद्र कार्यान्वित केले जाईल. तसेच वेळोवेळी प्रसिध्द होणारे शासन निर्णय/परिपत्रक/शुध्दीपत्रकात दिलेल्या सूचनांची काटेकारेपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.त्याचा भंग केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता केंद्र बंद करणेत येईल.
2. उमेदवारांकडे संगणक ज्ञानाबाबत (MS-CIT/ CCC) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
3. उमेदवार हा गुंतवणूकीचे दृष्टीकोणातून सक्षम असला पाहीजे.
4. उमेदवाराने संगणक साहित्य व इतर अनुषंगीक साहित्य व जागा उपलब्ध असलेबाबत योग्य तो तपशिल जोडणे आवश्यक आहे.
5. CSC ID अस्तित्वात असणा-या B२C सेवा देणा-या केंद्र चालकांनी अर्ज केल्यास त्यांना प्राधान्य क्रमाने आपले सरकार सेवा केंद्र देण्यात येईल.
6. एकापेक्षा अधिक CSC ID अस्तित्वात असणा-या केंद्र चालकांनी एका जागेसाठी अर्ज केल्यास केंद्राच्या उलाढाली/ व्यवहारांची अधिक संख्या असणा-यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
7. आपले सरकार सेवा केंद्र धारक म्हणून पात्र ठरल्यास एक महिन्याचे आत संबंधित पोलीस स्टेशनचे चारित्र पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
8. महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या आपले सरकार सेवा केंद्राबाबत 19 जानेवारी,2018 च्या शासन निर्णयाला अधिन राहून केंद्राची नियुक्ती व कार्यान्वित केल्या जाईल. तसेच आवेदकांना अटी व शर्तीचे पालन करावे लागेल.
9. आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करणारा अर्जदार हा त्या गावातील रहिवाशी असावा. जर त्या गावातील अर्ज आले नसेल त्या लगतच्या गावाचा विचार करणेत येईल.
10. शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार केंद्र चालू ठेवणे, शासनाने ठरवून दिलेले दरपत्रक केंद्रावर दर्शनी भागात प्रसिध्द करणे, तसेच ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक शुल्काची आकारणी न करणे, शासनाने पुरविलेल्या आज्ञावलीचा (software) इ. योग्य वापर, संरक्षण, व जतन करणे आवेदकांना बंधनकारक राहील.
11. आपले सरकार सेवा केंद्र हे केंद्राच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अधिसूचित ठिकाणीच चालविणे क्रमप्राप्त आहे. केंद्राचे ठिकाण बदलण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास गंभीर स्वरुपाची चूक समजून केंद्र रदद करणेत येईल.

12. संबंधित अर्जदार यांना जिल्हयामध्ये (शहरी किंवा ग्रामीण भागात) फक्त एकाच ठिकाणी नव्याने “आपले सरकार सेवा केंद्रा” साठी अर्ज करता येईल. (एका पेक्षा जास्त केंद्रासाठी अर्ज भरल्यास एकाच केंद्रास नियमानुसार मान्यता देणेत येईल.)

13. ग्रामीण व शहरी भागात नव्याने दयावयाच्या ऑनलाईन यादीनुसारच अर्ज सादर करावा. इतर ठिकाणासाठी मागणी केलेस आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

14. अर्जदार यांना अर्ज भरण्याबाबत काही अडचणी असल्यास त्यांनी कार्यालयातील सेतू विभागाकडून अधिक माहिती प्राप्त करुन घ्यावी. इतर त्रयस्थ व्यक्तीमार्फत अर्ज सादर करु नये. तसे निदर्शनास आल्यास आपला अर्ज अपात्र ठरविणेत येईल.

15. आपले सरकार सेवा केंद्राना शासनाचे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वेळोवेळी देण्यात येणारे निर्देशांचे पालन करावे लागेल. तसेच उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचे वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करावे लागेल. तसेच त्यांन केंद्राबाबत मागविलेला अहवाल तात्काळ सादर करावा लागतील.

16. शासन निर्णयानुसार ठरवून दिलेल्या सेवा आपले सरकार सेवा केंदातून ऑनलाईन पध्दतीने देणे अनिवार्य राहील. याबाबत नागरीकांकडून तक्रार प्राप्त झाल्यास त्यांची गंभीर घेण्यात येईल व चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

17. निर्गत केलेल्या दाखल्याच्या / प्रमाणपत्राच्या स्थळप्रती पुढील पुढील महिन्यात संबंधित उपविभागीय अधिकारी / तहसिल कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील.

18. अर्जामध्ये भरलेली माहिती चूकीची आढळल्यास त्यांचा अर्ज रदद करण्यात येवून कायदेशीर कारवाई करणेत येईल.

19. सदरचे **“आपले सरकार सेवा केंद्र” नव्याने देणेबाबत कोणत्याही प्रकारची शासकीय फी स्वीकारली जात नसून संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य आहे. याकामी त्रयस्थ व्यक्तीबरोबर अर्थिक व्यवहार झाल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.**

20. **परिपूर्ण भरलेला अर्ज दिनांक :- 25.10.2018 ते 17.11.2018 या कालावधीत शासकीय कामकाजाचे दिवशी सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.45 या वेळेतच जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील सेतु शाखेकडील आवक (संगणक कक्ष) समक्ष सादर करुन त्याची पोहोच पावती घ्यावी. इतर कोणत्याही मार्गाने आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

21. प्राप्त अर्जापैकी कोणता अर्ज स्वीकारायचा,कोणता अर्ज नाकारायचा किंवा संपूर्ण प्रक्रिया कोणतेही कारण न देता रदद करणेचे अधिकार **मा. अध्यक्ष, जिल्हा सेतू समिती, (जिल्हा ई-गर्व्हनन्स सोसायटी), तथा जिल्हाधिकारी, नांदेड.** यांचेकडे राखून ठेवणेत आले आहेत.

अध्यक्ष, जिल्हा सेतू समिती,
(जिल्हा ई-गर्व्हनन्स सोसायटी),
तथा जिल्हाधिकारी, नांदेड.

**<u>नवीन "आपले सरकार सेवा केंद्र" मिळणेकामी भरावयाचा विहित नमुन्यातील अर्जाचा नमुना</u>**

**( सदरचा विहित नमुन्यातील अर्ज नांदेड जिल्हाचे ( https://nanded.gov.in/ ) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)**

| | |
|---|---|
| अर्ज क्रमांक /2018 | **शहरी (वार्ड) / ग्रामिण (गाव) ------------------------------------ ता. ---------------------- जि. नांदेड येथील आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज.** |

| |
|---|
| अर्जदाराचा फोटो |

प्रति,

**मा. अध्यक्ष,**
**जिल्हा सेतू समिती,**
**(जिल्हा ई-गर्व्हनन्स सोसायटी),**
**तथा जिल्हाधिकारी, नांदेड.**

विषय :- **<u>नवीन "आपले सरकार सेवा केंद्र" मिळणेबाबत.</u>**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मातंसं-1716/प्र.क्र.517/39 दिनांक 19 जानेवारी,2018.

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करणेत येते की, महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मातंसं-1716/प्र.क्र.517/39 दिनांक 19 जानेवारी,2018 रोजीचे शासन निर्णयानुसार मी. **<u>नवीन "आपले सरकार सेवा केंद्र"</u> मिळणेकामी जाहिरनाम्यात दिलेल्या अटी शर्तीस अधिन राहून खालील प्रमाणे माहिती सादर करित आहे.**

**<u>(अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती :-</u>**

1. अर्जदार यांचे संपूर्ण नाव :- ------------------------------------------------------------------------------------------

1. राहण्याचा पूर्ण पत्ता :- गाव /शहर :- ---------------------------------- वार्ड क्रमांक (शहरी भागाकरिता)

   तालुका :- -------------------------- जिल्हा :- --------------------- पिनकोड :- --------------------

2. जन्म तारीख (DDMMYY):- -----------/----------------/-------------------------------------------------------

3. लिंग :- पु./स्त्री :- ----------------------------------------------------------------------------------------------------

4. मोबाईल क्रमांक :- ----------------------------------------------------------------------------------------------------

5. ई-मेल आयडी :- ----------------------------------------------------------------------------------------------------

6. आधार कार्ड क्रमांक :- ----------------------------------------------------------------------------------------------

7. पॅनकार्ड क्रमांक :- ---------------------------------------------------------------------------------------------------

8. शिक्षण :- -------------------------------------------------------(कॉम्प्युटर कोर्स् )--------------------------------

9. कुटुंबातील व्यक्तीचे नावे यापूर्वीचे महा-ई सेवा केंद्र (महाऑनलाईन) किंवा संग्राम केंद्र मंजुर झालेले आहे काय? असल्यास त्याचे नाव व पत्ता :- ----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

केद्र कोणत्यावर्षी मिळाले त्याचा आयडी क्रमांक ------------------------- व केंद्र मंजूर झालेल्या तारखेपासून नियमित G2C व B2C सेवा देण्यात आल्या आहेत काय? असल्यास त्याचा तपशिल सादर करावा.

**(ब) नव्याने घ्यावयाच्या आपले सरकार सेवा केंद्रासाठी सादर करावयाच्या माहितीचा तपशिल :-**

**(1) पूर्वीचे C.S.C. (कॉमन सर्व्हीस सेंटर) असल्यास**

1. CSC ID (आहे किंवा नाही) असल्यास CSC ID क्रमांक ----------------------------------------------

केंद्राच्या जागेचा पत्ता :-

गाव /शहर :- ------------------------------- वार्ड क्रमांक (शहरी भागाकरिता) ----------------------------------

तालुका :- ------------------------------------- जिल्हा :- ---------------------------- पिनकोड :- ---------------

2. केंद्राचा अक्षांश ------------------------------------------ रेखांश ---------------------------------------------

3. जागेचे स्वरुप :- (स्वत:ची / भाडयाची) --------------------------- जागा ------------ चौ.फुट

(स्वत:ची असल्यास घरपावती व भाडयाची असल्यास भाडे पावती)

4. “आपले सरकार सेवा केंद्र” मागणी केलेल्या ठिकाणी इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे काय? होय / नाही (असल्यास कोणत्या कंपनीचे ----------------------------------)

5. उपलब्ध करुन दयावयाच्या तांत्रिक तपशिलाची संख्या (संगणक -----------,प्रिंटर------------स्कॅनर------)

6. मागील सहा महिन्यात केलेल्या B२C व्यवहाराची संख्या -------------------------

(2) **पूर्वीचे C.S.C. (कॉमन सर्व्हीस सेंटर) नसल्यास**

1. केंद्र चालवण्यासाठी निश्चित केलेल्या नियोजीत जागेचा पत्ता ---------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

गाव /शहर :- ------------------------------ वार्ड क्रमांक (शहरी भागाकरिता) ----------------------------

तालुका :- ------------------------------------- जिल्हा :- ---------------------------- पिनकोड :- ------------

2. केंद्राचा अक्षांश ------------------------------------------- रेखांश ----------------------------------------------

3. जागेचे स्वरुप :- (स्वत:ची / भाडयाची) ---------------------------- जागा ------------ चौ.फुट

(स्वत:ची असल्यास घरपावती व भाडयाची असल्यास भाडे पावती)

**(क) नवीन आपले सरकार सेवा केंद्र मिळणेकमी सादर करावयाची आवश्यक कागदपत्र (स्वयंसाक्षांकित Self Attested )सोबत सादर करावयाची कागदपत्रे.**

1. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राच्या (स्वंयसाक्षांकित) प्रती
2. संगणक अर्हता प्रमाणपत्राच्या (स्वंयसाक्षांकित) प्रती
3. आधार कार्ड (स्वंयसाक्षांकित) प्रत
4. पॅन कार्ड (स्वंयसाक्षांकित) प्रत
5. जागेच्या मालकी हक्काची / भाडेतत्वावरची कागदपत्रे
6. बँकेचे पासबूक अदयावत छपाईसह
7. कार्यान्वित असलेल्या / नियोजीत जागेचे आतील व बाहेरील फोटो
8. संबंधित पोलीस स्टेशनचे चारीत्रय प्रमाणपत्र अर्जा सोबत सादर करणे आसश्यक आहे.

अर्जदाराचे स्वाक्षरी

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करणेत येते की, मी श्री./श्रीमती ------------------------------------------------------------------------ ------------------------------रा. ----------------------------ता.---------------------------------जि.------------येथील रहिवाशी असून आपले कार्यालयाकडील https://nanded.gov.in/ या संकेतस्थळावर नव्याने **<u>"आपले सरकार सेवा केंद्र" देणेकामी</u>** प्रसिध्द केलेल्या रिक्त केंद्राच्या यादीस अधिन राहून तसेच दिनांक -----------------------रोजीच्या दैनिक --- -------------------------वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या कालावधीस अधिन राहून वार्ड/गाव ------------------------------------ ----ता--------------------------जि. नांदेड या ठिकाणी **<u>नवीन "आपले सरकार सेवा केंद्र" मिळणेकामी अर्ज सादर करित आहे.</u>**

मला सोबतच्या नमुद सर्व अटी शर्ती तसेच **मा. अध्यक्ष,जिल्हा सेतू समिती,(जिल्हा ई-गर्व्हनन्स सोसायटी), तथा जिल्हाधिकारी, नांदेड यांचा <u>"आपले सरकार सेवा केंद्र" मिळणेबाबतचा अंतिम निर्णय मान्य आहे. याबाबत माझी कोणती तक्रार राहणार नाही.</u>**

करिता मी आज दिनांक ---------/---------/2018 रोजी स्वत:चे स्वाक्षरीने प्रतिज्ञापत्र सादर करीत आहे.

अर्जदार

**स्वाक्षरी**------------------------------------------------------------------------

नाव :- ------------------------------------------------------------------------

**पत्ता :-** ------------------------------------------------------------------------

दिनांक :- ----------------------------------------------